ISSN 2278-8808 SJIF 2014 = 4.889
An International Peer Reviewed & Referred
SCHOLARLY RESEARCH JOURNAL
FOR INTERDISCIPLINARY STUDIES

# पूर्व प्राथमिक शिक्षणाची संकल्पना, सदयस्थिती आणि शिक्षक शिक्षणाची आवश्यकता एक दृष्टीक्षेप

**प्रा. देवीप्रसाद तावरे**

*Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com*

## पूर्व प्राथमिक शिक्षणाची संकल्पना

१) ''२ ते ६ वर्षे वयोगटातील बालकांना दिल्या जाणाऱ्या शिक्षणास पूर्वप्राथमिक शिक्षण असे म्हणतात.''
२) ''प्राथमिक शिक्षणाची पूर्व तयारी म्हणजे पूर्वप्राथमिक शिक्षण होय.''
३) ''प्राथमिक शिक्षणासाठी प्रवेश घेण्याअगोदर बालकांना दिल्या जाणाऱ्या शास्त्रशुध्द पद्धतीच्या शिक्षणाला पूर्वप्राथमिक शिक्षण असे म्हणतात.''
४) ''विशिष्ट वयोगटातील बालकांचे शारीरिक, मानसिक, बौध्दीक आणि भावनिक विकसन घडवून आणण्यासाठी त्यांच्या अवतीभवती जाणीवपूर्वक तयार केलेले वातावरण म्हणजे पूर्व प्राथमिक शिक्षण होय.''

पूर्व प्राथमिक शिक्षणाचा अभ्यास करताना पूर्व व पश्चिमेकडील देशांतील शैक्षणिक धोरणांचा अभ्यास करणे आवश्यक आहे. नॉर्वे देशात बालकांची सर्वाधिक काळजी घेतली जाते. बालकांचे संगोपन हे राष्ट्रीय कर्तव्य समजण्यात आले आहे. जपान आणि चीनचा जर विचार केला तर त्याठिकाणी पूर्वप्राथमिक शिक्षणाला अनन्यसाधारण असे महत्त्व असून बालकांचा कल लक्षात घेवून त्या पध्दतीचे शिक्षण देण्याची व्यवस्था या देशांनी निर्माण केले आहे. प्रगत राष्ट्रांमध्ये ज्या प्रमाणात पूर्व प्राथमिक शिक्षणाचा प्रसार आणि प्रचार झाला त्या प्रमाणात भारतात झालेला आढळून येत नाही. ०६ ते १४ वयोगटातील बालकांना मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण देण्याची तरतुद घटनेतच केली असून त्यासंदर्भात शिक्षण हक्क कायदाही आपल्या देशात लागू झाला आहे. परंतु असे असले तरी पूर्वप्राथमिक शिक्षणाबाबत मात्र कोणतीही सक्ती करण्यात आलेली नाही, म्हणूनच भारत देशामध्ये जर का कोणते शिक्षण दुर्लक्षित असेल तर ते म्हणजे पूर्वप्राथमिक शिक्षण होय. जगाच्या तुलनेत मागे राहण्याच ते एक महत्त्वाच कारण आहे.

पाया जर भक्कम असेल तर त्यावर भक्कम इमारत उभी राहू शकते. हेच तत्त्व शिक्षणालाही लागू आहे. प्राथमिक शिक्षणाचा पाया म्हणजे पूर्वप्राथमिक शिक्षण असे असले तरी स्वातंत्र्यापूर्वी या शिक्षणाच्या बाबतीत गंभीर नसणारे भारतीय मात्र स्वातंत्र्योत्तर काळात काही प्रमाणात का होईना जागृत झालेले आढळून येतात.

घर हिच बालकाची पहिली शाळा आणि आई वडिल, कुटुंबातील सदस्य हेच पहिले शिक्षक असतात. असे असले तरी किमान ०२ वर्षे ते ०६ वर्षे वयापर्यंतच्या बालकांना त्यांच्या बालमानसशास्त्राचा अभ्यास करुन, त्याप्रमाणे पाठयक्रमाची रचना करुन किमान विशिष्ट कालावधी पुरते तरी शैक्षणिक वातावरण त्यांच्यासाठी निर्माण करण्याची आवश्यकता आहे.

चिखलाच्या गोळयाला ज्याप्रमाणे आकार दयावा त्याप्रमाणे त्या विशिष्ट आकाराचे मातीचे भांडे तयार होते. त्याप्रमाणे बालकांच्या शारीरिक, बौध्दीक, भावनिक आणि मानसिक विकसनासाठी शास्त्रशुध्द अभ्यासक्रमाची निर्मिती होणे व त्याची काटेकोटर अंमलबजावणी होणे आत्यंतिक गरजेचे आहे. असे जर होणार नसेल तर आपण महासत्तेच पहात असलेले स्वप्न हे स्वप्नच राहिल्यावाचून राहणार नाही.

## ❖ पूर्व प्राथमिक शिक्षणाची सदयस्थिती

पूर्व प्राथमिक शिक्षणाच्या सदयस्थितीचा अभ्यास करताना तिचा विविधांगी अभ्यास आवश्यक ठरतो.

१) शहरी भागातील पूर्वप्राथमिक शिक्षण.
२) निमशहरी भागातील पूर्वप्राथमिक शिक्षण.
३) ग्रामिण भागातील पूर्वप्राथमिक शिक्षण.
४) वाडया, वस्त्या, पाडे, तांडे आणि आदिवासी दुर्गम अतिदुर्गम भागातील पूर्वप्राथमिक शिक्षण.

## १) शहरी भागातील पूर्वप्राथमिक शिक्षण

शहरीकरणामुळे निर्माण झालेल्या भौतिक सुविधांमुळे बरीचशी नागरी वस्ती शहरी भागांत एकवटलेली आहे. चांगल्या पगाराच्या नोकऱ्या, व्यवसाय, उदयोगधंदे, हमखास मिळणारा रोजगार यामुळे लोकांचे राहणीमान उंचावलेले आहे. शिक्षणाच्या विविध संधी निर्माण झाल्यामुळे विदयार्थी विविध क्षेत्रात यशस्वीपणे वाटचाल करत आहेत.

शिक्षणाविषयी लोकांना असलेली समज, सुशिक्षितपणा यामुळे पूर्वप्राथमिक शिक्षणाच्या बाबतीत शहरी भागात मोठया प्रमाणात जागृती झालेली आढळून येते. त्यामुळे बालकांच्या शैक्षणिक आयुष्याला सुरुवात होते. एकंदरीतच पूर्वप्राथमिक शिक्षणाच्या बाबतीत शहरी भागात एक चांगले वातावरण असले तरी पूर्वप्राथमिक शाळांमधील देणग्या, प्रवेशांतील घोळ इत्यादींमुळे

सर्वसामान्यांना त्यांच्या पाल्यांना नामांकित शाळांमध्ये प्रवेश घेता येत नाही. झोपडपट्टीतील बालके व आर्थिक दुर्बल घटकांतील बालकांचे पूर्वप्राथमिक शिक्षण हा संशोधनाचा एक स्वतंत्र विषय होवू शकतो.

### २) निमशहरी भागातील पूर्वप्राथमिक शिक्षण □

निमशहरी भागात पूर्वप्राथमिक शिक्षणाचे महत्त्व समाजमनाला पटताना दिसून येत आहे. असे असले तरी त्यासंदर्भात मोठया प्रमाणात मनजागृती होण्याची आवश्यकता आहे.

तालुक्याची ठिकाणे व मोठया लोकसंख्येच्या गावांमधून सरकारी व खाजगी व्यवस्थापनाच्या पूर्वप्राथमिक शाळांमधून म्हणजे बालवाडया व अंगणवाडयांमधून बालकांना पूर्वप्राथमिक शिक्षण दिले जाते. सरकारी बालवाडया व अंगणवाडयांमधून बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी पोषक वातावरण असल्याचे आढळत नाही. असे असले तरी काही ठिकाणी निश्चितच कौतुकास्पद काम होत आहे.

विविध व्यवस्थापनांमधून बालकांना दिले जाणारे पूर्वप्राथमिक शिक्षण त्या शिक्षणाचा दर्जा व गुणवत्ता हा गुंतागुंतीचा विषय आहे. प्रशिक्षित शिक्षकांचा अभाव, पोषण आहाराची कमतरता, ढिसाळ व्यवस्थापन, होणारा राजकीय हस्तक्षेप, कुचकामी कायदे व सरकारी धोरण यांमुळे बालकांचा सर्वांगिण विकास साध्य होईल काय? अशी भिती वाटल्यावाचून राहात नाही.

### ३) ग्रामिण भागातील पूर्वप्राथमिक शिक्षण □

ग्रामिण भागातील पूर्वप्राथमिक शिक्षणाची सदयस्थिती समाधानकारक नाही. सरकारी अंगणवाडया व बालकवाडयांमधून दिले जाणारी पूर्वप्राथमिक शिक्षण हे समाधानकारक नाही. या पूर्वप्राथमिक शाळा म्हणजे पोषण आहार वाटणारी केंद्रे झाल्या आहेत. त्यामुळे विदयार्थ्यांना किती व कसे शिक्षण दिले जात असेल याचा विचार न केलेलाच बरा. ग्रामिण भागातील पूर्वप्राथमिक शिक्षणाची परिस्थिती अत्यंत बिकट असून ती बदलण्याची गरज आहे.

ग्रामीण भागातील पूर्वप्राथमिक शिक्षणासाठी नव्या ध्येय धोरणांची निर्मिती करणे व त्याची अंमलबजावणी करणे काळाची गरज आहे. त्यामुळे दर्जेदार व गुणवत्तापुर्ण शिक्षणाची संधी ग्रामिण भागातील बालकांना निर्माण होईल. जोपर्यंत अशी संधी या भागातील बालकांना मिळत नाही तो पर्यंत पूर्वप्राथमिक शिक्षणाचा दर्जा उंचावणार नाही, प्राथमिक शिक्षणासाठी आवश्यक असलेली पायाभरणी शक्य होणार नाही.

### ४) वाडया, पाडया, तांडे आणि आदिवासी दुर्गम अतिदुर्गम भागातील पूर्वप्राथमिक शिक्षण □

या भागात शिक्षणाचा म्हणावा तसा प्रसार झालेला नाही. अज्ञान, दारिद्रय आणि अनिष्ठ रुढी परंपरांमुळे या भागात सर्वच बाबतीत मागासलेपणा आढळून येतो. बऱ्यास ठिकाणी लोकसंख्या विरळ असल्यामुळे पूर्वप्राथमिक शिक्षणाची कोणतीही सुविधा तेथील बालकांना उपलब्ध होत नाही. ज्या ठिकाणी पूर्वप्राथमिक शिक्षणाची सुविधा आहे त्या ठिकाणी दिले जाणारे शिक्षणाची परिस्थिती भयावह आहे.

या भागातील बालकांना दर्जेदार व गुणवत्तापूर्ण पूर्वप्राथमिक शिक्षण देणे हे शासनाचे आद्य कर्तव्य असावयास हवे. या भागातील बालकांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणल्याशिवाय आपल्याला खऱ्या अर्थाने स्वातंत्र्य मिळाले असे म्हणता येणार नाही.

### ❖ पूर्वप्राथमिक शिक्षक शिक्षणाची आवश्यकता □

प्राथमिक शिक्षणाचा पाया भक्कम करण्यासाठी तसेच बालकांचा सर्वांगिण विकास साध्य करण्यासाठी शिक्षण क्षेत्रात पूर्वप्राथमिक शिक्षक शिक्षणाला अनन्यसाधारण असे महत्त्व आहे.

पूर्वप्राथमिक शिक्षक शिक्षणाची आवश्यकता खालील मुदयांवरुन लक्षात येईल□

१) बालकांचे योग्य पध्दतीने संगोपन होण्यासाठी
२) बालकांचा मानसिक व बौध्दीक विकास होण्यासाठी
३) बालकांवर योग्य संस्कार व शिस्त लावण्यासाठी
४) प्राथमिक शिक्षणाची योग्य ती पूर्वतयारी करण्यासाठी
५) बालकांच्या क्षमता व कौशल्यांचा विकास करण्यासाठी
६) सामाजिक प्रबोधन घडवून आणण्यासाठी
७) अभ्यासक्रमाची अंमलबजावणी प्रभावी व परिणामकारकपणे होण्यासाठी
८) बालकांच्या वाढ व विकासातील अडथळे दूर करण्यासाठी
९) बालकांना आनंददायी शिक्षण देण्यासाठी
१०) बालकांमधील सुप्त गुणांचा विकास करण्यासाठी
११) शासकिय योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी
१२) पूर्वप्राथमिक व प्राथमिक शिक्षणातील दुवा निर्माण करण्यासाठी
१३) स्पर्धेला सामोरी जाणारी पिढी निर्माण करण्यासाठी
१४) सभोवतालच्या परिस्थितीशी बालकांचे योग्य ते समायोजन साधण्यासाठी
१५) बालकांना शिक्षण विषयक आवड निर्माण करण्यासाठी
१६) जागतिक नागरिक घडविण्यासाठी

०२ ते ०६ वयोगटातील बालकांनाही मोफत व सक्तीचे पूर्वप्राथमिक शिक्षण देणे ही काळाची गरज आहे. त्यासाठी अभ्यासक्रमाची निर्मिती व मूल्यमापनाची विविध साधने आवश्यक आहेत. एकंदरीतच जगाशी तुलना करताना आपल्या कडील पूर्वप्राथमिक शिक्षणाची अवस्था

ही निराशाजनक असून श्रीमंत व मध्यमवर्गीय परिस्थितीतील बालकांपुरते हे शिक्षण मर्यादित असल्याचे चित्र आढळून येते. हे चित्र बदलण्याची जबाबदारी एक भारतीय नागरिक म्हणून माझी आणि तुमचीही आहे.

जोपर्यंत दर्जेदार व गुणवत्तापूर्ण पूर्वप्राथमिक शिक्षण हे शहरांपासून वाडया पाडयापर्यंत पोहचत नाही तोपर्यंत जागतिक महासत्तेचे स्वप्न बघणे व्यर्थ आहे.

मूठभर भांडवलदारांच्या हाती एकवटलेले सत्तेचे दोर जोपर्यंत देशातील शेतकरी, कष्टकरी, सर्वसामान्यांच्या हाती जात नाहीत तसेच त्यांच्या मुलांना सर्वोच्च प्रशासकिय पदी सेवा करण्याची संधी मिळत नाही तोपर्यंत आपल्या शिक्षणाने काही कमावले आहे, असे म्हणता येणार नाही.

पूर्वप्राथमिक शिक्षणासाठी व्यापक चळवळ उभी करुन बालकांना त्यांच्या सर्वांगिण प्रगतीची संधी निर्माण करुन देणे हे आपले राष्ट्रीय कर्तव्य असायला हवे.

तर आणि तरच जगाच्या रोज बदलणाऱ्या घडामोडींशी व वेगाशी समायोजन साधणारी पिढी निर्माण होईल आणि 'मेरा देश महान' असे अभिमानाने म्हणता येईल.